# ॥ श्री गुरुदेव दत्त ॥

दत्तात्रेयो हरि: कृष्ण उन्मादी नंददायक: ।
मुनि: दिगंबरो बाल: पिशाचो ज्ञानसागर: ॥१॥
एतानिदशनामानि सर्व काले सदा पठेत् ॥
मनसा चिंतितं कार्यं सिध्दं भवति नान्यथा ॥२॥
अत्रिपुत्रो महातेजो दत्तात्रेयो महामुनि: ।
तस्य स्मरण मात्रेण सर्वपापै: प्रमुच्यते ॥३॥

(नाथालीलामृत २६ वा अध्याय १०७ ओळी)

दत्तात्रय, हरी कृष्ण, उन्मादी, नंददायक, मुनि, बाल, दिगंबर, पिशाचो, ज्ञानसागरहि दहा नावे सर्व काळ पठन केल्याने मनांतअसलेली सर्व कार्ये सिद्ध होतात. तसेच त्यांच्या नुसत्या स्मरण मात्रानें सर्व पापांचा विनाशहोतो. श्री दत्तात्रयाला स्मर्तुगामी म्हटले आहे, कारण त्यांच्या नुसत्या स्मरणाने ते प्रगट होतात.

*****

## श्रीगुरुवंदनम् / दीप नमस्कार

ॐ नमो ज्ञान दीपाय शिवाय ब्रह्म तेजसे ।
कविष्णुहररुपाय नम श्रीगुरुमूर्तये :॥ १ ॥
अज्ञानध्वान्तपटलविध्वंसनदिवाकरान् ।
सच्चीदानंदबोधैक सुधाम्बुधिकलानिधीन् ॥ २ ॥
आधिव्याधिभयग्रस्त प्रपन्नजनरक्षकान् ।
वन्दे बद्धांजलि: श्रीमत्परिज्ञानाश्रमान् गुरून् ॥ ३ ॥
इलापातालनाकस्थपूजित श्रीशिवेशितु: ।
चरणींबुरुहन्यस्त मनोवाक्कायसंभ्रमान् ॥ ४ ॥
ईश्वरान् वेदवेदांगवेदांतज्ञानिनां धुरि ।
छात्रवृन्दसुखाधारान् भजे श्रीशंकराश्रमान् ॥ ५ ॥
उपमाभावमहिमाजितसर्वारिमण्डलान् ।
सारस्वतव्दिजवरैराराधितपदांबुजान ॥ ६ ॥
ऊर्जस्वलान्महामोहग्राहग्रासैककर्ममणि ।
नमाम्यानंदरूपान् श्रीपरिज्ञानाश्रमान गुरुन् ॥ ७ ॥
एकस्मिन्नव्दितीये च ब्रह्मण्याविष्टमानसान् ।
यमादियोगसंपत्तिभ्राजमानमुनीश्वरान् ॥ ८ ॥
ऐश्वर्याद्यखिलार्थानां दायकान् करुणानिधीन् ।
ईडे योगांबुधिक्रीडासक्तान् श्रीशंकराश्रमान् ॥ ९ ॥
ओजस्विन: सुतपसा व्दैताब्धिवडवानलान् ।

स्वांध्रयब्जशरणोद्धर्तृन् स्तौमि श्रीकेशवाश्रमान् ॥ १० ॥
औपाधिके कर्मगर्ते मोहितभ्रांतचेतसाम् ।
समुद्धरणधौरेयान् वन्दे श्रीवामनाश्रमान् ॥ ११ ॥
अंजसा तमसः पारमनायासेन सर्वदा ।
नृपशून्नयतोनौमि कृष्णाश्रमयतिश्वरान् ॥ १२ ॥
अहंवन्देमनोवाग्भ्यां पांडुरंगाश्रमान्मुहुः ।
संस्तवैः परयाभक्त्या विविधैर्भक्तिलक्षणैः ॥ १३ ॥
करकंजभवांस्तेषां वन्दे धर्म धुरंधरान् ।
आनन्दरुपिणः श्रीमदानन्दाश्रमसद्गुरुन् ॥ १४ ॥
खब्रह्माविष्टहृदयान व्दैतध्वांत दिवाकरान् ।
प्रशान्त दान्तोपरतान् परिज्ञाना श्रामान्नुमः ॥ १५ ॥
गरिमा दृश्यते येषां वेदान्तार्थ निरूपणे ।
संवित्ज्ञान तपोदीप्तान निगमागम पारगान् ।
संविद्देवी समासत्कान्ः श्रृत्यंत् पथदर्शकान् ।
सद्योजातान् नमाम्यंत्र शंकराश्रम देशिकान् ॥ १६ ॥
॥ भो पराक् स्वामिन पराक् ॥

*****

## ॥ ध्यानम् ॥

श्रीगणेशाय नमः । श्रीमत् दत्तात्रेयगुरवे नमः । अथ ध्यानम् । दिगंबरं भस्मगंधसुलेपनं चक्रं त्रिशूलं डमरुं गदा च । पद्मासनस्थं रविसोमनेत्रं । दत्तात्रेयं ध्यानमभीष्टसिध्दिदम् ॥१॥ काषायवस्त्रं करदंडधारिणं । कमंडलुं पद्मकरेण शंखम् । चक्रं गदाभूषितभूषणाढयं । श्रीपादराजं शरणं प्रपद्दे ॥२॥ कृते जनार्दनो देवस्त्रेतायां रघुनंदनः । द्वापारे रामकृष्णौच कलौ श्रीपादवल्लभः ॥३॥

## ॥ बावन श्लोकी श्रीगुरुचरित्र ॥

ॐ नमोजी विघ्नहारा । गजानना गिरिजाकुमरा ॥ जय जयाजी लंबोदरा एकदंता शूर्पकर्णा ॥१॥
त्रिमूर्तिराजा गुरु तूचि माझा । कृष्णातिरीं वास करूनी ओजा । सद्-भक्त तेथे करिती आनंदा । त्या देव स्वर्गी बघती विनोदा ॥२॥
जय जयाजी सिद्धमुनी । तू तारक भवार्णवांतुनी ॥ संदेह होता माझे मनीं । आजि तुवां कुडें केलें । ऐशी शिष्यची विनंती ॥३॥
ऐकुनि सिद्ध काय बोलती ॥ साधु साधु तुझी भक्ति । प्रीती पावो श्रीगुरुचरणी ॥४॥
भक्तजनरक्षणार्थ । अवतरला श्रीगुरुनाथ । सगरपुत्रांकारणे भगीरथ । गंगा आणिली भूमंडळी ॥५॥
तीर्थे असती अपार परी । समस्त सांडुनि प्रीति करी । कैसा पावला श्रीदत्तात्री । श्रीपाद श्रीवल्लभ ॥६॥
ज्यावरी असे श्रीगुरुची प्रीति । तीर्थ महिमा ऐकावया चित्ती । वांछा होतसे त्या ज्ञानज्योती । कृपामूर्ति यतिराया ॥७॥

गोकर्णाक्षेत्री श्रीपादयति । राहिले तीन वर्षे गुप्ती । तेथूनी गुरु गिरिपुरा येती । लोकानुग्रह करणे ॥८॥
श्रीपाद कुरवपुरीं असता । पुदें वर्तली कैसी कथा । विस्तारूनि सांग आतां । कृपामूर्ति दातारा ॥९॥
सिद्ध म्हणे नामधारसी । श्रीगुरुमहिमा काय पुससी । अनंतरूपें परीयेसी । विश्वव्यापक परमात्मा ॥१०॥
सिद्ध म्हणे ऐक वत्सा । अवतार झाला श्रीपाद हर्षा । पूर्ववृत्तांत ऐकिला ऐसा । कथा सांगितली विप्रस्त्रियेची ॥११॥
श्रीगुरु म्हणती जननीसी । आम्हा ऐसा निरोप देसी । अनित्यशरीर तू जाणसी । काय भरंवसा जीविताचा ॥१२॥
श्रीगुरुचरित्रकथामृत । सेवितां वांच्छा अधिक होत । शमन करणार समर्थ । तूची एक कृपासिंधु ॥१३॥
ऐकुनि शिष्याचे वचन । संतोष करी सिद्ध आपण । श्रीगुरुचरित्र कामधेनू जाण । सांगता झाला विस्तारें ॥१४॥
ऐक शिष्या शिरोमणी । धन्य धन्य तुझी वाणी । तुझी भक्ति श्रीगुरुचरणीं । लीन झाली परियेसी ॥१५॥
विनवी शिष्य नामांकित । सिद्ध योगीयातें पुसत । सांगा स्वामी वृत्तांत । श्रीगुरुचरित्र विस्तारें ॥१६॥
ऐक शिष्या नामकरणी । श्रीगुरुभक्त शिखामणि । तुझी भक्ति श्रीगुरुचरणीं । लीन झाली निर्धारें ॥१७॥
ध्यान लागलें श्रीगुरुचरणीं । तृप्ति नोहे अंतःकरणीं । कथामृत संजीवनी । आणिक निरोपावी दातारा ॥१८॥
अज्ञान तिमिर रजनींत निजलो होतों मदोन्मत्त । श्रीगुरुचरित्र वचनामृत । प्राशन केले दातारा ॥१९॥
स्वामी निरोपिले आम्हासीं । श्रीगुरु आले गाणगापुरासी । गौप्यरूपें अमरपुरासी । औदुंबरी असती जाण ॥२०॥
सिद्ध म्हणे नामधारका । ब्रह्मचारी कारणिका । उपदेशी ज्ञानविवेका । तये प्रेतजननीसी ॥२१॥
तुझा चरण संपर्क होता । झाले ज्ञान मज आतां । परमार्थी मन ऐकतां । झाले तुझे प्रसादें ॥२२॥
लोटांगणे श्रीगुरुसी । जाऊनि राजा भक्तिसी । नमस्कारी विनयें सी । एकभावें करूनिया ॥२३॥
शिष्यवचन परिसुनी । सांगता झाला सिद्धमुनी । ऐक भक्ता नामकरणी । श्रीगुरुचरित्र अभिनव ॥२४॥
सिद्ध म्हणे ऐक बाळा । श्रीगुरुची अगम्य लीला । सांगता न सरे बहुकाळा । साधारण मी सांगतसें ॥२५॥
श्रीगुरु म्हणती ब्राह्मणासी । नको श्रमू रे युक्तिसी । वेदांत न ब्रम्हयासी । अनंतवेद असती जाण ॥२६॥
चतुर्वेद विस्तारेसी । श्रीगुरु सांगती विप्रासी । पुढे कथा वर्तली कैसी । विस्तारावी दातारा ॥२७॥
नामधारक म्हणे सिद्धसी । पुढील कथा सांगा आम्हासी । उल्हास होतो माझे मानसी । श्रीगुरुचरित्र अति गोड ॥२८॥
पुढे कथा कवणेपरी झाली असे श्रीगुरुचरित्रीं । निरूपावें विस्तारी । सिद्धमुनी कृपासिंधु ॥२९॥

श्रीगुरुचरित्र सुधारस । तुम्ही पाजिता आम्हास । परी तृप्त नव्हे गा मानस । तृषा आणिक होतसे ॥३०॥
सिद्ध म्हणे नामधारका । पुढे अपूर्व झालें ऐका । योगेश्वर कारणिका । सांगे स्त्रीयांचे स्वधर्म ॥३१॥
पतिव्रतेची रीती । सांगे देवासी बृहस्पति । सहगमनाची फलश्रुति । येणेपरी निरूपिली ॥३२॥
श्रीगुरु आले मठासी । पुढे कथा वर्तली कैसी । विस्तारुनि आम्हांसी । निरूपावें स्वामिया ॥३३॥
श्रीगुरु म्हणती दंपतीसी । ऐका पराशरऋषि । तया कश्मीर रायासी । रूद्राक्षमहिमा निरूपिला ॥३४॥
पुढे कथा कैसी वर्तली । विस्तारुनि सांगा वाहिली । मति माझी असे वेधिली । श्रीगुरुचरित्र ऐकावया ॥३५॥
गाणगापुरी असतां श्रीगुरु । महिमा झाला अपरंपारु । सांगता नये विस्तारु । तावन्मात्र सांगतसे ॥३६॥
ऐसा श्रीगुरु दातारु । भक्तजना कल्पतरु । सांगता झाला आचारु । कृपा करुनी विप्रांसी ॥३७॥
आर्त झालो मी तृषेचा । घोट भरवी गा अमृताचा । चरित्रभाग सांगे श्रीगुरुचा । माझे मन नीववी वेगी ॥३८॥
सिद्ध म्हणे नामधारका । पुढे अपूर्व झाले ऐका । साठ वर्षे वांझ देखा । पुत्रकन्या प्रसवली ॥३९॥
सिद्ध म्हणे नामधारका । अपूर्व वर्तलें आणिक ऐका । वृक्ष झाला काष्ठ सुका । विचित्र कथा परियेसी ॥४०॥
जयजयाजी सिद्धमुनी । तू तारक या भवार्णवांतुनी । नानाधर्म विस्तारुनि । श्रीगुरुचरित्र निरूपिलें ॥४१॥
मागे कथानक निरूपिलें । सायंदेव शिष्य भले । श्रीगुरुंनी त्यासी निरूपिलें । कलत्र पुत्र आणि म्हणती ॥४२॥
श्रीगुरू म्हणती व्दिजासी । या अनंत व्रतासी । सांगेन ऐका तुम्हांसी । पूर्वी बाहुतीं आराधिलें ॥४३॥
श्रीगुरु माझा मल्लिकार्जुन । पर्वत म्हणजे श्रीगुरुभुवन । आपण नये आतां येथून । सोडून चरण श्रीगुरुचे ॥४४॥
तू भेटलासी मज तारक । दैन्य गेले सकाळहि दुःख । सर्वाभीष्ट लाधलें सुख । श्रीगुरुचरित्र ऐकतां ॥४५॥
गाणगापुरीं असतां श्रीगुरु । ख्याति झाली अपारु । लोक येती थोरथोरु । भक्त बहुत झाले असती ॥४६॥
सांगेन ऐका कथा विचित्र । जेणे होय पतित पवित्र । ऐसें हे गुरुचरित्र । तत्परतेसी परीयेसा ॥४७॥
श्रीगुरुनित्य संगमासीं । जात होते अनुष्ठानासी । मार्गात शूद्र परीयेसी । शेतीं आपल्या उभा असे ॥४८॥
त्रिमूर्तिचा अवतार । वेषधारी झाला नर । राहिले प्रीतीं गाणगापुर । कवण क्षेत्र म्हणूनिया ॥४९॥
तेणे मागितला वर । राज्यपद धुरंधर । प्रसन्न झाला त्यासी गुरुवर । दिधला वर परीयेसी ॥५०॥
राजभेटी घेऊनी । श्रीपाद आले गाणगाभुवनीं । योजना करिती आपुले मनीं । गौप्य रहावें म्हणूनिया ॥५१॥
म्हणे सरस्वती गंगाधर । श्रोतयां करी नमस्कार । कथा ऐका मनोहर । सकळाभीष्ट लाधेल ॥५२॥

॥ इति श्रीगुरुचरित्र कथा कल्पतरौ सिद्ध नामधारक संवादे द्विपंचाशतश्लोकात्मकं श्रीगुरुचरित्र संपूर्णम् ॥

*****

## ॥ श्रीगुरुपादुकाष्टक ॥

श्रीगणेशाय नमः ॥ अथ गुरुपादुकाष्टक प्रारंभः ॥ ज्या संगतीनेंच विराग झाला ॥ मनोदरींचा जडभास गेला ॥ साक्षात्परात्मा मज भेटवीला ॥ विसरूं कसा मी गुरूपादुकांला ॥१॥ सद्योगपंथे घरीं आणियेलें ॥ अंगेच मातें परब्रह्म केलें ॥ प्रचंड तो बोधरवी उदेला ॥ विसरूं कसा मी गुरूपादुकांला ॥२॥ चराचरीं व्यापकता जयाची ॥ अखंड भेटी मजला तयाची ॥ परंपदीं संगम पूर्ण झाला ॥ विसरूं कसा मी गुरूपादुकांला ॥३॥ जो सर्वदा गुप्त जनांत वागे ॥ प्रसन्न भक्तांनिजबोध सांगे ॥ सद्-भक्तिभावाकरितां भुकेला ॥ विसरूं कसा मी गुरूपादुकांला ॥४॥ अनंत माझे अपराध कोटी ॥ नाणीं मनीं घालुनि सर्व पोटीं ॥ प्रबोधितां तो श्रम फार झाला ॥ विसरूं कसा मी गुरूपादुकांला ॥५॥ कांही मला सेवनही न झालें ॥ पितया तेणें मज उध्दरीलें ॥ आतां तरी अर्पिन प्राण त्याला ॥ विसरूं कसा मी गुरूपादुकांला ॥६॥ आतां कसा मी उपकार फेडूं ॥ हा देह ओवाळुनि दूर सोडूं ॥ म्यां एकभावें प्रणिपात केला ॥ विसरूं कसा मी गुरूपादुकांला ॥७॥ जया वानितां वेदवाणी ॥ म्हणे नेति नेति तिला जे दुरोनी ॥ नव्हे अंत न पार ज्याच्या रूपाला ॥ विसरूं कसा मी गुरूपादुकांला ॥८॥ जो साधुच्या अंकित जीव झाला ॥ त्याचा असे भार निरंजनाला ॥ नारायणाचा श्रम दूर केला ॥ विसरूं कसा मी गुरूपादुकांला ॥९॥
॥ इति श्रीनारायणविरचितं श्रीगुरूपादुकाष्टकं संपूर्णम् ॥ श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

## ॥ पद ॥

श्रीपाद श्रीवल्लभ नरहरि तारीं तारीं मजला ॥ दयाळा तारीं तारीं मजला ॥ श्रमलों मी या प्रपंचधामीं आलों शरण तुला ॥ध्रु॥ करितां आटाआटी ॥ प्रपंच अवघा दिसतो मिथ्यत्व ॥ दत्त दिगंबर ॥ म्हणवुनि भजन तुझें मज देवा भासे सत्यत्व ॥ श्रीपाद श्रीवल्लभ नरहरि तारीं तारीं मजला ॥ दयाळा तारीं तारीं मजला ॥ श्रमलों मी या प्रपंचधामीं आलों शरण तुला ॥२॥ किंचिन्मात्र कृपा करीं मजवरि करिसि उदार मन ॥ दयाळा करिसि उदार मन ॥ चुकेन मी या विषयसुखांच्या आहारांतुनि जाण ॥ श्रीपाद श्रीवल्लभ नरहरि तारीं तारीं मजला ॥ दयाळा तारीं तारीं मजला ॥ श्रमलों मी या प्रपंचधामीं आलों शरण तुला ॥३॥ कृष्णातटनिकटीं जो विलसे दयाळा औदुंबरछायीं ॥ हंसपरात्परभारतिनायक लीन तुझे पायीं ॥ श्रीपाद श्रीवल्लभ नरहरि तारीं तारीं मजला ॥ दयाळा तारीं तारीं मजला ॥ श्रमलों मी या प्रपंचधामीं आलों शरण तुला ॥४॥

*****

## ॥ दत्तात्रेयस्तोत्रम् ॥

जटाधरं पाण्डुरंगं शूलहस्तं दयानिधिम् ।
सर्वरोगहरं देवं दत्तात्रेयमहं भजे ॥१॥
जगदुत्पत्तिकर्त्रे च स्थितिसंहारहेतवे ।

भवपाशविमुक्ताय दत्तात्रेय नमोस्तु ते ॥२॥
जराजन्मविनाशाय देहशुद्धिकराय च ।
दिगंबर दयामूर्ते दत्तात्रेय नमोस्तु ते ॥३॥
कर्पूरकान्तिदेहाय ब्रह्ममूर्तिधराय च ।
वेदशास्त्रपरिज्ञाय दत्तात्रेय नमोस्तु ते ॥४॥
ह्रस्वदीर्घकृशस्थूलनामगोत्रविवर्जित ।
पञ्चभूतैकदीप्ताय दत्तात्रेय नमोस्तु ते ॥५॥
यज्ञभोक्त्रे च यज्ञेय यज्ञरूपधराय च ।
यज्ञप्रियाय सिद्धाय दत्तात्रेय नमोस्तु ते ॥६॥
आदौ ब्रह्मा मध्ये विष्णुरन्ते देवः सदाशिवः ।
मूर्तित्रयस्वरूपाय दत्तात्रेय नमोस्तु ते ॥७॥
भोगालयाय भोगाय योगयोग्याय धारिणे ।
जितेन्द्रिय जितज्ञाय दत्तात्रेय नमोस्तु ते ॥८॥
दिगंबराय दिव्याय दिव्यरूपधराय च ।
सदोदितपरब्रह्म दत्तात्रेय नमोस्तु ते ॥९॥
जंबूद्वीप महाक्षेत्र मातापुरनिवासिने ।
भजमान सतां देव दत्तात्रेय नमोस्तु ते ॥१०॥
भिक्षाटनं गृहे ग्रामे पात्रं हेममयं करे ।
नानास्वादमयी भिक्षा दत्तात्रेय नमोस्तु ते ॥११॥
ब्रह्मज्ञानमयी मुद्रा वस्त्रे चाकाशभूतले ।
प्रज्ञानघनबोधाय दत्तात्रेय नमोस्तु ते ॥१२॥
अवधूत सदानन्द परब्रह्मस्वरूपिणे ।
विदेह देहरूपाय दत्तात्रेय नमोस्तु ते ॥१३॥
सत्यरूप सदाचार सत्यधर्मपरायण ।
सत्याश्रय परोक्षाय दत्तात्रेय नमोस्तु ते ॥१४॥
शूलहस्त! गदापाणे! वनमाला सुकन्धर ।
यज्ञसूत्रधर ब्रह्मन् दत्तात्रेय नमोस्तु ते ॥१५॥
क्षराक्षरस्वरूपाय परात्परतराय च ।
दत्तमुक्तिपरस्तोत्र! दत्तात्रेय नमोस्तु ते ॥१६॥
दत्तविद्याड्यलक्ष्मीश दत्तस्वात्मस्वरूपिणे ।
गुणनिर्गुणरूपाय दत्तात्रेय नमोस्तु ते ॥१७॥
शत्रुनाशकरं स्तोत्रं ज्ञानविज्ञानदायकम् ।
आश्च सर्वपापं शमं याति दत्तात्रेय नमोस्तु ते ॥१८॥
इदं स्तोत्रं महद्दिव्यं दत्तप्रत्यक्षकारकम् ।
दत्तात्रेयप्रसादाच्च नारदेन प्रकीर्तितम् ॥१९॥

*****

## ॥ पद ॥

भवतारक या तुझ्या पादुका घेईन मी माथां ॥ करावी कृपा गुरूनाथा ॥ध्रु॥ बहु अनिवार हें मन तुझें चरणीं स्थिर व्हावे ॥ तव पदीं भजनीं लागावें ॥ कामक्रोधादिक हे षड्रिपु समूळछेदावें ॥ हेंचि मागणें मला द्यावें ॥ चाल ॥ अघहरणा करीं करूणा दत्ता धाव पाव आतां ॥ करावी कृपा गुरूनाथा ॥१॥ तूंचि ब्रह्मा तूंचि विष्णु तूंचि उमाकांत ॥ तूंचि समग्र दैवत ॥ माता पिता इष्ट बंधु तूंचि गणगोत ॥ तूंचि माझें सकळ तीर्थ ॥ चाल ॥ तुजविण मी गा कांहिच नेणें तूंचि कर्ता हर्ता ॥ करावी कृपा गुरूनाथा ॥२॥ तनमनधन हें सर्व अर्पुनीं कुरवंडीन काया ॥ उपे नको गुरूराया ॥ कर्महीन मी, मतीहीन मी, सकळ श्रम वायां ॥ लज्जा राखी गुरूसदया ॥ चाल ॥ मातृबाला परिसांभाळीं तूंचि मुक्तिदाता ॥ करावी कृपा गुरूनाथा ॥३॥ शेषा ब्रह्मया वेदां न कळे महिमा तव थोर ॥ तेथें मी काय पामर ॥ वियोग नसुं दे तव चरणांचा हाचि देई वर ॥ चाल ॥ शिरीं या ठेवीं अभयकर ॥ चाल ॥ हीच विनंती दर्शन द्यावें दासा रघुनाथा ॥ करावी कृपा गुरूनाथा ॥४॥

*****

## ॥ श्री दत्तबावनी ॥

नारेश्वर निवासी श्री रंगावधूत महाराजांच्या गुजराती दत्तबावनी चा के. नी. करंदीकर. नीं केलेला समवृत्त मराठी अनुवाद

जय योगेश्वर दत्तदयाळ। तूंची करिसी जगतीं प्रतिपाळ।
अत्र्यनसूये करुनि निमित्त। प्रगटसि जगतास्तव निश्चित ॥२॥
ब्रह्माऽच्युतशंकरअवतार। शरणागत भक्ता आधार।
अंतर्यामी सतचित्सुख। प्रगटसि सद्गुरु द्विभुज सुमुख ॥४॥
काखिं अन्नपूर्ण झोंळी। शांति कमंडलु करकमळी।
कुठें षड्भुजा कोठे चार। अनंत बाहु असिस निर्धार ॥६॥
शरणागत मी बाल अजाण। दिगंबरा ऊठ, जातो प्राण।
सहस्त्रार्जुनाचा धांवा। ऐकुनि तुष्ट होसि देवा ॥८॥
दिधली ऋद्धि सिद्धि अपार। अंति मुक्ति महापद सार।
बारशी कारे आजि विलंब। तुजविण मजासि नसे आलंब ॥१०॥
श्राद्धदिनीं विष्णुद्विजाला। प्रेमे जेवुनि वर दिधला।
जंभदैत्य छळी देवांना। करुनि कृपा रक्षिसि त्यांना ॥१२॥
विस्तारुनि माया दिति सुत। इन्द्रकरें वधविला त्वरित।
ऐशी लीला जी जी सर्व। वर्णवेल ती कोणा सर्व ॥१४॥
येता आयु सुतेच्छेने। तृप्तचि केला वरदाने।
बोधियले यदु परशुराम। साध्यदेव प्रल्हाद अकाम ॥१६॥
अशी तुझी ही कृपा अगाध। ऐकसि कां नच माझी साद ?
धांव अनंता, पाहि न अंत। न करी अवचित शिशुचा अंत ॥१८॥
द्विजपत्नीचा पाहुनि स्नेह। पुत्र हासि तूं नि:संदेह।
स्मर्तृगामि कलियुगि तारक। उद्धरिला त्वां दीन रजक ॥२०॥

पोटशुळी द्विज तारियला। ब्राम्हणशेठहि रक्षियला।
दया न कां ये दीनदयाळ ? पाहि मजकडे एकचि वेळ ॥२२॥
शुष्क वृक्ष त्वां पल्लविला। उदास मजवरि कां झाला।
वंध्या वृद्धेची स्वप्‌नें। सत्य केलि त्वां पूर्णपणें ॥२४॥
निरसुनि विप्रतनूचे कोड। पुरविसि त्याच्या मनिंचे कोड।
वांझ महिषिसी दोहविलें। दैन्य सुभक्तांचे हरिले ॥२६॥
घेवाडिशेंगा भक्षुनियां। सुवर्णघट देशी सदया।
ब्राह्मणस्त्रीच्या मृत पतिला। सजीव निश्चित त्वां केला ॥२८॥
पिशाच्चपोडा सारुनि दूर। विप्रपुत्र उठवियला शूर।
अंत्यजहस्तें विप्रमदास। हरुनि रक्षिले त्रिविक्रमास ॥३०॥
निमिषार्धी तंतुक भक्तांस। पोंचविले पर्वत शैलास।
एकचि वेळीं अष्टस्वरूप,। होसि, असिस बहुरूप, अरूप ॥३२॥
तोषविला निजभक्त सुजात। प्रचीत देउनियां साक्षात्।
शमविलि यवन नृपाची पीड। जात पांथे तुझ भीड न चीड ॥३४॥
रामकृष्ण या अवतारा। केल्या लीला कितिक  तरी।
तारिसी प्रस्तर, गणिका, व्याघ्र। पशुपक्ष्यांसहि गणसी साध ॥३६॥
अधमोद्धारण गातां नाम। कोण कोणते पुरवि न काम ?
आधि व्याधि उपाधि सर्व टळति स्मरणमात्रेंचि शर्व ॥३८॥
मूठ, चेटुक न चाले जाण। पावे नर स्मरणें निर्वाण।
डाकिण, शाकिण, महिषासुर। भुतें पिशाच्चें, झिंद असुर ॥४०॥
पळतात मुठी आवळुनी। 'दत्तधून' पडतां श्रवणी।
करुनि धूप गाईल नेमें। 'दत्तबावनी' जो प्रेमें ॥४२॥
साधिल दोन्ही इहपरलोक। मनीं तयाच्या उरे न शोक।
राहिल सिद्धि दासिपरि। दुःख दैन्यही पळे दुरी ॥४४॥
बावन गुरुवारीं नितनेम। बावन पाठ करी सप्रेम।
यथावकाशें करुनि नियम। तया कदापि न दंडी यम. ॥४६॥
अनेकरूपी दत्त अभंग। भजतां नडे न माया 'रंग'।
नामे सहस्त्र , नामी एक। दत्तदिगंबर असंग एक ॥४८॥
वंदू तुजला वारंवार। वेदहि  श्र्वसित तुझें निर्धार।
जिथें वर्णितां थकला शेष। कोण रंक मी बहुकृतवेष ? ॥५०॥
अनुभव तृप्तीचे उग्दार। यांसि हंसे त्या बसेल मार।
तपसी, तत्वमसि तो देव। बोला जय जय श्रीगुरुदेव ॥५२॥
नरेश्वरवासी गुरुनी। गुंफिलि जी दत्तबावनी।
गुजराती स्तुतीसुमनांनी। भक्तजनांच्या उद्धरणीं।
साज मराठी लेवबुनी। अर्पियली सद्गुरुचरणी।

आलंब - आधार, दिसिष्ठत - दैत्य, आयु - आयु नावां राजा, साद - हांक, स्मर्तुगामी - स्मरण करतांच प्रगट होणारा, रजक - धोबी, पीड - पीडा, प्रस्तर - शिला, दगड, साध - साधुवृत्तीचे, यथावकाश - वेळ मिळेल त्याप्रमाणे, शर्व - शिवस्वरूप.

*****

## ॥ श्री दत्तावतार स्मृति ॥

### चाल : 'सत्य वादे वचनाला' सारखी .

चैतन्यस्वरूपी दत्तदयाघन भक्तवरद मूर्ति ।
अतुल पराक्रम दत्ताकृपेचा गाजे जगिं कीर्ति ॥ धृ.॥
अत्रिसुत ते जगिं अवतरती । श्रीपाद श्रीवल्लभ ते यति ।
स्वयेंचि ते नरसिंहसरस्वती । गंधर्वपुरी ज्यां वसति ।
अक्कलकोटी येऊनी वसले । समर्थ स्वामी नाम पावले ।
जपी तपस्वी किती उद्धरिले । भक्तजनांवरि बहु प्रीती ।
श्रीदत्तांचे स्थान मनोहर । रचुनि वसविले माणिकनगर ।
रमलें तेथें माणिकप्रभुवर । दत्त युगायुगिं अवतरती ।
शिरडी बाबा साई दयाघन । हीन दीन भजकां करि पावन ।
दत्ताचा अवतार वदति जन । दीनोव्दारणि हौस अती ।
वटोदरीं श्रीकुबेरजींनी । प्रमत्त गज लीलेनें रोंखुनि ।
केला वास नृपतिचे सदनीं । जीवन्मुक विदेह स्थिति ।
जगदुध्दारास्तव संचारण । मंत्र देऊनि करिती रक्षण ।
गरुडेश्वरासि झाले भूषण । वासुदेव आनंद यति ।
नारेश्वरस्थालिं रेवातीरी । रंगावधूत राहुनियां करि ।
दत्तभक्तिचा प्रसार भूवरि । प्रेमभरे गुर्जरप्रांती ।
स्वामिदास विनविती गुरुवरा । भाक दिली जी ज्ञानभास्करा ।
सत्य करावी त्वरित ती गिरा । देउनियां झणिसहजस्थिति ॥

*****

## ॥ श्रीकरुणात्रिपदी ॥

शांत हो श्रीगुरुदत्ता । निज चित्ता शमवी आतां ॥ध्रु०॥
तूं केवळ माता जनिता । सर्वथा तूं हितकर्ता ॥
तूं आप्तस्वजन भ्राता । सर्वथा तूंचि त्राता ॥ (चाल)
भयकर्ता तूं भयहर्ता । दंड धर्ता तूं परिपाता । तुजवांचुनि न दुजी वार्ता ।
तूं आर्तां आश्रय दत्ता ॥१॥ शांत हो श्रीगुरुदत्ता..
अपराधास्तव गुरुनाथा । जरि दंडा धरिसी यथार्था ॥
तरि आम्ही गाऊनि गाथा । तव चरणीं नमवूं माथा ॥ (चाल)
तूं तथापि दंडिसी देवा । कोणाचा मग करूं धावा । सोडविता दुसरा तेव्हां ।
कोण दत्ता आम्हां त्राता ॥२॥ शांत हो श्रीगुरुदत्ता..

तूं नटसा होउनि कोपी । दंडितांहि आम्ही पापी ।
पुनरपिही चुकतां तथापि । आम्हांवरि नच संतापी ॥ (चाल)
गच्छतः स्खलनं क्वापि । असें मानुनि नच हो कोपी । निजकृपालेशा ओपी ।
आम्हांवरि तूं भगवंता ॥३॥ शांत हो श्रीगुरुदत्ता..
तव पदरीं असतां ताता । आडमार्गीं पाऊल पडतां ।
सांभाळुनि मार्गावरता । आणितां न दूजा त्राता । (चाल)
निज बिरुदा आणुनि चित्ता । तूं पतीतपावन दत्ता । वळे आतां आम्हां वरता ।
करुणाघन तूं गुरुनाथा ॥४॥ शांत हो श्रीगुरुदत्ता..
सहकुटुंब सहपरिवार । दास आम्ही हें घरदार ।
तव पदीं अर्पूं असार । संसाराहित हा भार ।(चाल)
परिहरिसी करुणासिंधो । तूं दीनानाथ सुबंधो । आम्हां अघलेश न बाधो ।
वासुदेव प्रार्थित दत्ता ॥ शांत हो श्रीगुरुदत्ता । मम चित्ता शमवी आतां ॥५॥

*****

श्रीगुरुदत्ता जय भगवंता । तें मन निष्ठुर न करीं आता ॥ध्रु०॥
चोरें द्विजासी मारितां मन जें । कळवळलें तें कळवळो आतां ॥ श्रीगुरुदत्ता ॥१॥
पोटशुळानें द्विज तडफडतां । कळवळलें तें कळवळो आतां ॥ श्रीगुरुदत्ता ॥२॥
द्विजसुत मरतां वळलें तें मन । हो कीं उदासीन न वळे आतां ॥ श्रीगुरुदत्ता ॥३॥
सतिपति मरतां काकुळती येतां । वळलें तें मन न वळेकिं आतां ॥ श्रीगुरुदत्ता ॥४॥
श्रीगुरु दत्ता त्यजिं निष्ठुरता । कोमल चित्तां वळवीं आतां ॥ श्रीगुरुदत्ता ॥५॥

*****

जय करुणाघन निजजनजीवन । अनसूयानंदन पाहि जनार्दन ॥ध्रु०॥
निजअपराधें उफराटी दृष्टी । होऊनि पोटी भय धरूं पावन ॥१॥ जय०॥
तूं करुणाकर कधिं आम्हांवर । रुसशी न किंकर वरद कृपाघन ॥२॥ जय०॥
वारी अपराध तूं माय बाप । तव मनिं कोप लेश न वामन ॥३॥ जय०॥
बालकापराधां गणे जरि माता । तरी कोण त्राता देईल जीवन ॥४॥ जय०॥
प्रार्थि वासुदेव पदिं ठेवी भाव । पदिं देवो ठाव देव अत्रिनंदन ॥५॥ जय०॥

*****

## ॥ श्रीदत्तात्रेय शरणाष्टक ॥

दत्तात्रेया तव शरणं । दत्तनाथा तव शरणं ॥
त्रिगुणात्मका त्रिगुणातीता । त्रिभुवनपालक तव शरणं ॥१॥
शाश्वतमूर्ते तव शरणं । श्याम सुंदरा तव शरणं ॥
शेषाभरणा शेषाभूषण । शेषशायिगुरु तव शरणं ॥२॥
षड्भुजमूर्ते तव शरणं । षड्भुज यतिवर तव शरणं ॥
दंडकमंडलु गदापद्मकर । शंखचक्रधर तव शरणं ॥३॥
करुणानिधे तव शरणं । करुणासागर तव शरणं ॥
कृष्णासंगमि तरुवर वासी । भक्तवत्सला तव शरणं ॥४॥
श्रीगुरुनाथा तव शरणं । सद्गुरुनाथा तव शरणं ॥

श्रीपाद श्रीवल्लभ गुरुवर । नृसिंह सरस्वती तव शरणं ॥५॥
कृपामूर्ते तव शरणं । कृपासागरा तव शरणं ॥
कृपाकटाक्षा कृपावलोकन । कृपानिधे गुरु तव शरणं ॥६॥
कालांतका तव शरणं । कालनाशका तव शरणं ॥
पूर्णानंदा पूर्ण परेश । पुराण पुरुषा तव शरणं ॥७॥
हे जगदीशा तव शरणं । जगन्नाथ तव शरणं ॥
जगत्पालका जगदाधीशा । जगदुध्दारा तव शरणं ॥८॥
अखिलांतरा तव शरणं । अखिलैश्वर्या तव शरणं ॥
भक्तप्रीया वज्रपंजरा । प्रसन्नवक्त्रा तव शरणं ॥९॥
दिगंबरा तव शरणं । दीनदयाघन तव शरणं ॥
दीनानाथा दीनदयाळा । दीनोध्दारा तव शरणं ॥१०॥
तपोमूर्ते तव शरणं । तेजोराशी तव शरणं ॥
ब्रह्मानंदा ब्रह्मसनातन । ब्रह्ममोहना तव शरणं ॥११॥
विश्वात्मका तव शरणं । विश्वरक्षका तव शरणं ॥
विश्वंभरा विश्वजीवना । विश्वपरात्पर तव शरणं ॥१२॥
विघ्नांतका तव शरणं । विघ्ननाशका तव शरणं ॥
प्रणवातीता प्रेमवर्धना । प्रकाशमूर्ते तव शरणं ॥१३॥
निजानंदा तव शरणं । निजपददायक तव शरणं ॥
नित्यनिरंजन निराकारा । निराधारा तव शरणं ॥१४॥
चिद्घनमूर्ते तव शरणं । । चिदाकारा तव शरणं ॥
चिदात्मरूपा चिदानन्द । चित्सुखकंदा तव शरणं ॥१५॥
अनादिमूर्ते तव शरणं । अखिलावतारा तव शरणं ॥
अनंतकोटि ब्रह्मांडनायका । अघटित घटना तव शरणं ॥१६॥
भक्तोध्दारा तव शरणं । भक्तरक्षका तव शरणं ॥
भक्तानुग्रह भक्तजन प्रिय । पतितोध्दारा तव शरणं ॥१७।

## आनन्दाष्टक

(आनंदाचा कंद हरिहा, ह्या चालीवर) ताल केरवा

आनंदाश्रम नमो नमो जय । आनन्दघनते नमो नमो ॥
परिज्ञानाश्रम नमो नमो जय । परिज्ञानघनते नमो नमो ॥धृ.॥
अतुल प्रभावते नमो नमो जय । अनन्त महिमते नमो नमो ॥
अनुपमविक्रम अदृश्य वैभव । अगणित गुण ते नमो नमो ॥१॥
आर्यसुसेवित नमो नमो जय । आत्मतृप्तते नमो नमो ॥
आत्मानंदाऽज्ञान विनाशक । आश्रितरक्षक नमो नमो ॥२॥
इंदुसमानन नमो नमो जय । इंद्रादिप्रिय नमो नमो ॥
इंदुकलाधर चरण कमल संकलित। । हृदयते नमो नमो ॥३॥

ईशपरायण नमो नमो जय । ईहाविरहित नमो नमो ॥
ईशपदांबुज स्वर्चितकरयुग । ईस्पितार्थप्रद नमो नमो ॥४॥

*****

## श्रीपादाष्टक

श्रीपादाष्टक गाईन आतां । परमहंस गुरु ध्याईन ॥  ॥
प्रथमारंभि परिज्ञानाश्रम । सततपदाब्ज मी वंदिन ॥१॥
द्वितिय स्वयंभू शंकरगुरुवर । यति मनोहरां पाहिन ॥२॥
तृतिय परिज्ञाश्रम योगी । अति समर्था ध्यायीन ॥३॥
चातुर्थाश्रम शंकर मुनिवर । चतुरयोगेश्वर वंदिन ॥४॥
गुरुहे पंचम केशावाश्रम । परम सत्किर्ती ऐकेन ॥५॥
षष्टाश्रम मनोभिष्ट देणारे  श्रेष्ट सद्गुरु वामन ॥६॥
सप्तम परम श्रीकृष्णाश्रम । गुप्त पदब्जिं वसें मन ॥७॥
अष्टमाश्रम इष्ट देणारे । श्रेष्ट सद्गुरु वंदिन ॥
दंडधारि गुरु पांडुरंग हे । चंडदुरित करि खंडण ॥८॥
सुंदर मुर्ति त्रिभव बंधहर आनंदाश्रम पाहिन ॥९॥
दशमसद्गुरु परिज्ञानाश्रम ।  सुंदरयतिवरां वंदिन ॥१०॥
एकादशगुरु सद्योजाता शंकराश्रम वंदिन ॥११॥
वरचित्रापुर भवानी शंकर गुरुपारंपर्य पावन ॥१२॥

*****

## श्री दत्तगुरू भजन माळा

तुजला मी शरण श्रीपाद दत्तराज । तुजला ॥
बुडतो भवसिंधुमाजी, तारी तारी राखे लाज ॥धृ.॥
भोगियलें सुखदुःख, पाप पुण्य करुनियां ।
नाना योनीं फिरोनियां, नरदेही आलों आज ॥१॥
दीपपतंगाचे परी, संसाराची प्रीति भारी ।
तव भक्ति सोडोनियां, विषयांचे करी काज ॥२॥
तापत्रय वडवाग्नी नें, पोळलों मी नरहरि ।
कृष्णदास दौनावरि, कृपा करी महाराज ॥३॥

*****

त्रिगुणांचे पहा एक हें निधान । ब्रह्म हें सगुण दत्तात्रेय ॥१॥
दत्तया चरणीं खडावा सुंदर । कटीं पीतांबर पिंवळा शोभे ॥धृ॥
सर्वांगासी शोभे चंदनाची उटी । तिलक ललाटी केशराचा ॥२॥
मस्तकीं मुकुट शोभे नक्षत्रांचा । नयन पहा त्यांचा चंद्र सूर्य ॥३॥
ज्ञानदेव म्हणे आवडो हें ध्यान । आणिक साधन नलगे कांही ॥४॥

*****

सद्गुरुनाथ श्रीगुरुनाथ। मी अपराधी घ्या पदरांत।
सुमती ध्या सेवा घ्या कलिमल न्या आदीनाथ ॥धृ.॥
जन्मोजन्मीं प्रपंच केला पापांचा बहु संचय झाला।
दु ख भोग:हा नाहीं सरला। आलो शरण तुला ॥१॥
नरजन्मामधिं येवुनि राया। श्रमलों आतां बहु सुख घ्याया।
भक्ति नाही घडली क्षणभरि। गेलें वय वायां ॥२॥
षड्रीपूंचा गुलाम बनलों। प्रपंचपाशी बद्ध जाहलों।
नरकवास हा सौख्यद मानुनी। भजन सुखां मुकलों ॥३॥
धाव पाव गे सद्गुरुमाये। संसाराचे दु ख न साहे:।
पतित पावन ब्रीद राखुनी। धावत ये ये ये ॥४॥
श्रीनारायण सद्गुरु आई। त्रिविध ताप हा विलया नेई।
विष्णुदास पदीं करी प्रार्थना। भजन सुखा देई ॥५॥

*****

गुरुमहाराज गुरु। जयजय पदब्रह्म सद्गुरु ॥ धृ.॥
भक्तिमुक्तिदायक दाता उदार कल्पतरु ॥१॥
रूप जयांचे मन बुद्धिपर वाचे अगोचरु ॥२॥
अलक्ष अनाम अरूप अद्वय अक्षय परात्परु ॥३॥
आत्मरामी रामदास गोपाळ करुणाकरू ॥४॥

*****

## ॥ मानसपूजा ॥

मनोभाव जाणुनि माझा। सगुणरूप धरिले वोजा।
पाहुणा सद्गुरु राजा। आलावो माय ॥१॥
प्रथम अंत: करण जाण। चित्तबुध्दि आणि मन।
चोखाळुनि आसन। स्वामींसि केलें ॥२॥
अनन्य आवडींचे जळ। प्रक्षाळिले चरण कमळ।
वासना समूळ। चंदन लावी ॥३॥
अहंजाळियला धुप। सद्भाव उजळीला दीप।
पंचप्राण हे अपूप नैवेध्य केला ॥४॥
रजतम सांडुनि दोन्ही। विडा दिला सत्व गुणी।
स्वानुभवें रंगोनि। सुरंग दावी ॥५॥
एका जनार्दनी पूजा। देव भक्त नाही दूजा।
अवघाचि सद्गुरु राजा। होवोनि ठेला ॥६॥

*****

# श्री महालक्ष्म्यष्टक स्तोत्रं ॥

इंद्र उवाच

नमस्तेऽस्तु महामाये श्रीपीठे सुरपूजिते ।
शंखचक्र गदाहस्ते महालक्ष्मि नमोऽस्तु ते ॥ १ ॥
नमस्ते गरुडारूढे कोलासुर भयंकरि ।
सर्वपापहरे देवि महालक्ष्मि नमोऽस्तु ते ॥ २ ॥
सर्वज्ञे सर्ववरदे सर्व दुष्ट भयंकरि ।
सर्वदुःख हरे देवि महालक्ष्मि नमोऽस्तु ते ॥ ३ ॥
सिद्धि बुद्धि प्रदे देवि भुक्ति मुक्ति प्रदायिनि ।
मंत्र मूर्ते सदा देवि महालक्ष्मि नमोऽस्तु ते ॥ ४ ॥
आद्यंत रहिते देवि आदिशक्ति महेश्वरि ।
योगजे योग संभूते महालक्ष्मि नमोऽस्तु ते ॥ ५ ॥
स्थूल सूक्ष्म महारौद्रे महाशक्ति महोदरे ।
महा पाप हरे देवि महालक्ष्मि नमोऽस्तु ते ॥ ६ ॥
पद्मासन स्थिते देवि परब्रह्म स्वरूपिणि ।
परमेशि जगन्मातः महालक्ष्मि नमोऽस्तु ते ॥ ७ ॥
श्वेतांबरधरे देवि नानालंकार भूषिते ।
जगस्थिते जगन्मातः महालक्ष्मि नमोऽस्तु ते ॥ ८ ॥
महाक्ष्म्यष्टकं स्तोत्रं यः पठेद् भक्तिमान् नरः ।
सर्व सिद्धि मवाप्नोति राज्यं प्राप्नोति सर्वदा ॥
ऐककाले पठेन्नित्यं महापाप विनाशनम् ।
द्विकाल् यः पठेन्नित्यं धन धान्य समन्वितः ॥
त्रिकालं यः पठेन्नित्यं महाशत्रु विनाशनम् ।
महालक्ष्मी र्भवेन्नित्यं प्रसन्ना वरदा शुभा ॥
॥ इति इंद्र कृत श्री महालक्ष्म्यष्टक स्तोत्रं संपूर्णम् ॥

*****

## “ॐ द्रां दत्तात्रेयाय नमः”   मंत्र जप १०८ वेळा

*****

## ॥ श्री दत्तात्रेय अष्टोत्तर शतनामावलि ॥

ॐ श्री दत्ताय नमः
ॐ श्री देवदत्ताय नमः
ॐ श्री ब्रह्मदत्ताय नमः
ॐ श्री विष्णुदत्ताय नमः
ॐ श्री शिवदत्ताय नमः
ॐ श्री अत्रिदत्तय नमः
ॐ श्री आत्रेयाय नमः
ॐ श्री अत्रिवरदाय नमः
ॐ श्री अनसूयाय नमः
ॐ श्री अनसूयासूनवे नमः १०
ॐ श्री अवधूताय नमः
ॐ श्री धर्माय नमः
ॐ श्री धर्मपरायणाय नमः
ॐ श्री धर्मपतये नमः
ॐ श्री सिद्धाय नमः
ॐ श्री सिद्धिदाय नमः
ॐ श्री सिद्धिपतये नमः
ॐ श्री सिद्धिसेविताय नमः
ॐ श्री गुरवे नमः
ॐ श्री गुरुगम्याय नमः २०
ॐ श्री गुरोर्गुरुतराय नमः
ॐ श्री गरिष्ठाय नमः
ॐ श्री वरिष्ठाय नमः
ॐ श्री महिष्ठाय नमः
ॐ श्री महात्मने नमः
ॐ श्री योगाय नमः
ॐ श्री योगगम्याय नमः
ॐ श्री योगादेशकराय नमः
ॐ श्री योगपतये नमः
ॐ श्री योगीशाय नमः ३०
ॐ श्री योगाधीशाय नमः
ॐ श्री योगपरायणाय नमः
ॐ श्री योगिध्येयांघ्रिपंकजाय नमः
ॐ श्री दिगंबराय नमः
ॐ श्री दिव्यांबराय नमः
ॐ श्री पीतांबराय नमः
ॐ श्री श्वेतांबराय नमः
ॐ श्री चित्रांबराय नमः
ॐ श्री बालाय नमः
ॐ श्री बालवीर्याय नमः ४०
ॐ श्री कुमाराय नमः
ॐ श्री किशोराय नमः
ॐ श्री कंदर्पमोहनाय नमः
ॐ श्री अर्धांगालिंगितांगनाय नमः
ॐ श्री सुरागाय नमः
ॐ श्री विरागाय नमः
ॐ श्री वीतरागाय नमः
ॐ श्री अमृतवर्षिणे नमः
ॐ श्री उग्राय नमः
ॐ श्री अनुग्ररूपाय नमः ५०
ॐ श्री स्थविराय नमः
ॐ श्री स्थवीयसे नमः
ॐ श्री शांताय नमः
ॐ श्री अघोराय नमः
ॐ श्री मूढाय नमः
ॐ श्री ऊर्ध्वरेतसे नमः
ॐ श्री एकवक्त्राय नमः
ॐ श्री अनेकवक्त्राय नमः
ॐ श्री द्विनेत्राय नमः
ॐ श्री त्रिनेत्राय नमः ६०
ॐ श्री द्विभुजाय नमः
ॐ श्री षड्भुजाय नमः
ॐ श्री अक्षमालिने नमः
ॐ श्री कमंडलुधारिणे नमः
ॐ श्री शूलिने नमः
ॐ श्री डमरुधारिणे नमः
ॐ श्री शंखिने नमः
ॐ श्री गदिने नमः
ॐ श्री मुनये नमः
ॐ श्री मौलिने नमः ७०
ॐ श्री विरूपाय नमः
ॐ श्री स्वरूपाय नमः
ॐ श्री सहस्रशिरसे नमः
ॐ श्री सहस्राक्षाय नमः
ॐ श्री सहस्रबाहवे नमः
ॐ श्री सहस्रायुधाय नमः
ॐ श्री सहस्रपादाय नमः
ॐ श्री सहस्रपद्मार्चिताय नमः
ॐ श्री पद्महस्ताय नमः
ॐ श्री पद्मपादाय नमः ८०
ॐ श्री पद्मनाभाय नमः
ॐ श्री पद्ममालिने नमः
ॐ श्री पद्मगर्भारुणाक्षाय नमः
ॐ श्री पद्मकिंजल्कवर्चसे नमः
ॐ श्री ज्ञानिने नमः
ॐ श्री ज्ञानगम्याय नमः
ॐ श्री ज्ञानविज्ञानमूर्तये नमः
ॐ श्री ध्यानिने नमः
ॐ श्री ध्याननिष्ठाय नमः
ॐ श्री ध्यानस्तिमितमूर्तये नमः
ॐ श्री धूलिधूसरितांगाय नमः
ॐ श्री चंदनलिप्तमूर्तये नमः
ॐ श्री भस्मोद्धूलितदेहाय नमः
ॐ श्री दिव्यगंधानुलेपिने नमः
ॐ श्री प्रसन्नाय नमः
ॐ श्री प्रमत्ताय नमः
ॐ श्री प्रकृष्टार्थप्रदाय नमः
ॐ श्री अष्टैश्वर्यप्रदानाय नमः
ॐ श्री वरदाय नमः
ॐ श्री वरीयसे नमः १००
ॐ श्री ब्रह्मणे नमः
ॐ श्री ब्रह्मरूपाय नमः
ॐ श्री विष्णवे नमः
ॐ श्री विश्वरूपिणे नमः
ॐ श्री शंकराय नमः
ॐ श्री आत्मने नमः
ॐ श्री अंतरात्मने नमः
ॐ श्री परमात्मने नमः १०८

**ॐ श्री दत्तात्रेयाय नमो नमः**

*****

## श्री गणपती ची आरती

सुखकर्ता दु:खहर्ता वार्ता विघ्नांची । नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ।
सर्वांगी सुंदर उटी शेंदुराची । कंठी झळके माळ मुक्ताफळांची ॥१॥
जयदेव जयदेव जय मंगलमूर्ती । दर्शनमात्रें मनकामना पुरती ॥धृ॥
रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा । चंदनाची उटी कुमकुमकेशरा ।
हिरेजडित मुकुट शोभतोबरा । रुणझुणती नूपुरे चरणी घागरिया ।
जयदेव जयदेव जय मंगलमूर्ती । दर्शन मात्रे मनकामना पुरती ॥२॥
लंबोदर पीतांबर फणिवर बंधना । सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ।
दास रामाचा वाट पाहे सदना । संकटी पावावे निर्वाणी रक्षावे सुरवरवंदना ।
जयदेव जयदेव जय मंगलमूर्ती । दर्शन मात्रे मनकामना पुरती ॥३॥

*****

## आरती श्री दत्तात्रेयाची

त्रिगुणात्मक त्रैमुर्ती दत्त हा जाणा । त्रिगुणी अवतार त्रैलोक्यराणा ॥
नेती नेती शब्दें नयें अनुमाना । सुरवर मुनिजन योगी समाधि न ये ध्याना ॥१॥
जय देव जय देव जय श्री गुरुदत्ता । आरती ओवाळीतां हरली भवचिंता ॥ धृ ॥
सबाह्य अभ्यंतरी तूं एक दत्त । अभाग्यासी कैंची कळेल ही मात ॥
पराहि परतली तेथें कैंचा हेत । जन्ममरणाचा पुरलासे अंत ॥ जय देव ॥२॥
दत्त येऊनियां उभा ठाकला । सद्भावें साष्टांगेप्रणिपात केला ॥
प्रसन्न होऊ नी आशिर्वाद दिधला । जन्म मरणाचा फेरा चुकविला ॥ जय देव ॥३॥
दत्त दत्त ऐसें लागलें ध्यान । हरपालें मन झाले उन्मन ॥
मीतूपणाची झाली बोळवण । एकाजनर्दनीं श्रीदत्त ध्यान ॥ जय देव ॥४॥

*****

## श्री महालक्ष्मीची आरती

जयदेवी जयदेवी जय महालक्ष्मी
वससी व्यापकरुपे तू स्थुलसुक्ष्मी । जयदेवी जयदेवी ॥धृ॥
करविरपुरवासिनी सुरवरमुनि-माता
पुरहरवरदायिनी मुरहरप्रियकांता
कमलाकारे जठरी जन्मविला धाता
सहस्त्रवदनी भूधर न पुरे गुण गाता ॥
जयदेवी जयदेवी जय महालक्ष्मी
वससी व्यापकरुपे तू स्थुलसुक्ष्मी । जयदेवी जयदेवी ॥

मातुलिंग गदा खेटक रविकिरणीं
झळके हाटकवाटी पीयुष रसपाणी
माणिक रसना सुरंग वसना मृगनयनी
शशिधर वदना राजस मदनाची जननी ॥
जयदेवी जयदेवी जय महालक्ष्मी
वससी व्यापकरुपे तू स्थुलसुक्ष्मी । जयदेवी जयदेवी ॥
तारा शक्ति अगम्या शिवभजकां गौरी
सांख्य म्हणती प्रकृती निर्गुण निर्धारी
गायत्री निजबीजा निगमागम सारी
प्रगटे पद्मावती निजधर्माचारी ॥
जयदेवी जयदेवी जय महालक्ष्मी
वससी व्यापकरुपे तू स्थुलसुक्ष्मी । जयदेवी जयदेवी ॥
अमृत-भरिते सरिते अद्-भूरितें वारीं
मारी दुर्घट असुरां भवदुस्तर तारीं
वारी मायापटल प्रणमत परिवारी
हे रुप चिद्रुप तद्रुप दावी निर्धारी ॥
जयदेवी जयदेवी जय महालक्ष्मी
वससी व्यापकरुपे तू स्थुलसुक्ष्मी । जयदेवी जयदेवी ॥
चतुराननें कुत्सित कर्माच्या ओळी
लिहिल्या असतील माते माझे निजभाळी
पुसोनि चरणातळी पदसुमने क्षाळी
मुक्तेश्वर नागर क्षीरसागरबाळी ॥
जयदेवी जयदेवी जय महालक्ष्मी
वससी व्यापकरुपे तू स्थुलसुक्ष्मी । जयदेवी जयदेवी ॥

*****

## श्री मारुती आरती

सत्राणें उड्डाणें हुंकार वदनीं । करि डळमळ भूमंडळ सिंधुजळ गगनीं ॥
कडाडिले ब्रह्मांड धाके त्रिभुवनीं । गुरुवर नर निशाचर त्या जाल्या पळणी ॥१॥
जयदेव जयदेव जय जय हनुमंता । तुमचेनि प्रतापें न भिये कृतांता ॥धृ॥
दुमदुमले पाताळ उठला पडशब्द । धगधगला धरणीधर मानिला खेद ॥
कडाडिले पर्वत उड्डगण उच्छेद रामी रामदासा शक्तीचा शोध ॥२॥

*****

## श्री गुरुदेवदत्तात्रयांची पुष्पांजली

पुष्पांजली तुला अर्पितो दत्तगुरू सदया ।
तवपदी वंदन करण्या स्फूर्ती ध्यावी या हृदया ॥१॥

तुलसी, बेल, फुले सुवासिक, नानाविध माला ।
अर्पितसे बहुं प्रेमे आम्हीं श्री प्रभु चरणाला ॥२॥
किंचित सेवा, भजनपूजन हे घडले ह्या चरणीं ।
गोड करुनि घ्या प्रेमें आमुची भक्ताची करणी ॥३॥
दीनदयाळा भक्तवत्सला श्रीगुरुयति राया ।
पुष्पयुक्त अक्षता, अर्पितो प्रेमें तव पाया ॥४॥
साधुसंत, ऋषी, देवादिक हे नमीती तव पायीं ।
धन्य मानिती ते आपुल्याला संशय मुळी नाही ॥५॥
अत्रि ऋषि अनसुयासुता अवतरला कलिया ।
उध्दरण्या भक्तजनानां हरुनी पाप भया ॥६॥
दीनदयाळा आम्हीं लेकरें शरण तुला आलो ।
भक्तिप्रेमें पुष्पांजली हि वाहण्या सजलो ॥७॥

*****

## ॥ प्रदक्षिणा ॥

धन्य धन्य हो प्रदक्षिणा सद्गुरुरायाची ।
झाली त्वरा सुरवरा विमान उतरायाची ॥धृ.॥
पदोपदी अपार जाहल्या पुण्यांच्या राशी ।
सर्वहि तीर्थे घडली आम्हां आदि करून काशी ॥१॥
मृदुंग टाळ घोळ भक्त भावार्थे गाती ।
नामसंकीर्तने नित्यानंदे नाचती ॥२॥
कोटी ब्रम्हहत्या हरती करिता दंडवत ।
लोटांगण घालिता मोक्ष लोळे हो पायांत ॥३॥
गुरुभजनाचा महिमा न कळे अगमानिगमासी ।
अनुभव ते जाणति जे गुरुपदिंचे रहिवासी ॥४॥

## ॥ प्रदक्षिणा व नमस्कार ॥

घालीन लोटांगण वंदिन चरण । डोळ्यानी पाहीन रूप तुझे ॥
प्रेमे आलिंगन आनंदे पूजिन । भावें ओवाळिन म्हणे नामा ॥
त्वमेव माता च पिता त्वमेव । त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव ॥
त्वमेव विध्या द्रविणं त्वमेव । त्वमेव सर्वं मम देव देव ॥
कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा । बुध्यात्मना वा प्रकृति स्वभावात ॥
करोमि यध्यत् संकलं परस्मैं । नारायणयेति समर्पयामि ॥
अच्युतं केशवं रामनारायणं । कृष्ण दामोदरं वासुदेवं हरिं ॥
श्रीधरं माधवं गोपिका वल्लभं जानकीनायकं रामचंद्रं भजे ॥
हरे राम हरे राम, राम राम हरे हरे ।
हरे कृष्ण हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे ॥

हरे राम हरे राम, राम राम हरे हरे।
हरे कृष्ण हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे॥
हरे राम हरे राम, राम राम हरे हरे।
हरे कृष्ण हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे॥

*****

## ॐ गं गणपतये नमः

ॐ एकदंताय विद्महे। वक्रतुंडाय धीमहि। तन्नो दन्ती प्रचोदयात्॥
ॐ वाकदेव्यै च विद्महे। विरिंचि पत्नी च धीमहि। तन्नो वाणी प्रचोदयात्॥
ॐ गुरुदेवाय विद्महे। परब्रह्माय धीमहि। तन्नो गुरुः प्रचोदयात्॥
ॐ भूर्भुवः स्वः तत् सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्यः धीमहि धियो यो नः प्रचोदयात्॥
ॐ वेदांतनाथाय विद्महे। हिरण्यगर्भाय धीमहि। तन्नो ब्रह्मः प्रचोदयात्॥
ॐ नारायण विद्महे। वासुदेवाय धीमहि। तन्नो विष्णुः प्रचोदयात्॥
ॐ पंचवक्त्राय विद्महे। महादेवाय धीमहि। तन्नो रुद्रः प्रचोदयात्॥
ॐ दिगंबराय विद्महे। अत्रीसुता य धीमही। तन्नो दत्तः प्रचोदयात्॥
ॐ वायुपुत्रा विद्महे। अंजनीसुता य धीमही। तन्नो मारुति प्रचोदयात्॥
ॐ कात्यायनाय विद्महे। कन्याकुमारि धीमहि। तन्नो दुर्गिः प्रचोदयात्॥
ॐ महालक्ष्म्यै च विद्महे विष्णुपत्नी च धीमहि। तन्नो लक्ष्मीः प्रचोदयात्॥
ॐ त्र्यंबकं यजामहे सुगंधिं पुष्टिवर्धन। उर्वारुकमिव बंधनान्मृत्योर्मुक्षीय मामृतात्॥

*****

## ॥ मंगल पद ॥

मंगल शुभकर शंकरगे। मंगल विबुधवंदित पदगे॥
मंगल सुजनर रंगदिच्छेयनीव। रंगसद्गुरु महालिंगनिगे॥१॥
मंगल जय मंगलं॥ पल्लवि॥ नंदियनेरिद पुरहरगे।
कन्दुगोरळ गिरिजावरगे॥२॥
चंद्रादि सुरमुनिवृंदवन्दितनिगे। इन्दुशेखर गंगाधरगे॥३॥
पंचवदन विरुपाक्षनिगे। पंच बाणांतक रुद्रनिगे।
पंचभूताधिपनेनिसुत जगदोळू। संचरिसुव महामाहिमनिगे॥४॥
दाशरथिय मानोल्लासनिगे। वासवार्चित महेशनिगे॥
भासुरकोटीप्रकाशभरितनिगे। वासुकिशेषाभरणनिगे॥५॥
युक्ति योळु जनरनु करिसुवगे। भक्ति मार्गदोळु निलिसुवगे॥
मुक्तीय ग्रहविदेयेंदु तोरिसला। सक्तीय नावरोळु तरिसुवगे॥६॥
धरेयोळु वरचित्रापुरदोळगे। भैरव भवानीशंकरगे॥
गुरुपाण्डुरंग नोळेरकवागिरुव। परम परात्पर शंकरगे॥७॥

## मंगल पद

मंगल श्रीमहादेवं मंगल श्रीमहादेवं ॥ पल्लवी ॥
मंगल श्री महादेवं । मंगल दिव्य प्रभावं ॥
मंगल मदन दग्धारं । मंगल जयवीर वीरं ॥१॥
बालसुधाकर कृतवतंसं । शैल पुत्रिका मिलितांसं ॥
नतजन भवदव हरण सुधांशुं । श्री राजं वर परम हंसं ॥२॥
ढक्काविष्कृत वाङमयभूतिं । करवर धृत मृग वरदा भीर्ति ॥
दिगिभकराग्राब्जायात कीर्ति । प्रसादितानंदाश्रम मुर्ति ॥३॥
रविशशिकांति प्रकाशक रुपं । भव भयहर जगज्योति स्वरूपं ॥ दुरित विनाशक प्रणव स्वरूपं । परिज्ञानाश्रम श्री गुरुरूपं ॥४॥
श्रीपारेज्ञानानुग्रह भाजम । तत्पश्च्चात्स्वीकृत संन्यासम ॥
शंकराश्रम साध्योजातम । भूषित श्री चित्रापुर पीठम ॥५॥
कोमल बिल्वदलार्चित लिंगं । स्नापित पंचामृत दिव्यांगं ॥
भक्त जानाहित करूणा पांगं । दिव्य कपर्द सुदीव्यादांगं ॥६॥

## ॥ पार्वते पते हर हर महादेव ॥

*****

## ॥ नमस्काराष्टक ॥

सदा प्रार्थितो श्रीगुरुच्या पदासी । नमोनी हरी वंदितों आदरेंसी ॥
धरोनी करें तारि या बाळकासी । नमस्कार माझा गुरुदत्तात्रेयासी ॥ १ ॥
मतीहीन मी दीन आहे खरा हो । पदी दास तूझा मी कृपा करा हो ॥
जसें लेंकरुं पाळिले माय पोसी । नमस्कार माझा गुरुदत्तात्रेयासी ॥ २ ॥
लडिवाळ मी बाळ अज्ञान तूझें । गुरुवीण कोण पांग फेडिल माझें ॥
तुझ्यावीण कोणी न त्राता आम्हांसी । नमस्कार माझा गुरुदत्तात्रेयासी ॥ ३ ॥
पिता माय बंधू आम्हां तूंचि देवा । पुत्र मित्र सारे हा व्यर्थ हेवा ॥
कळोनीच ऐशी ही भ्रांति आम्हांसी । नमस्कार माझा गुरुदत्तात्रेयासी ॥ ४ ॥
गुरूची लीला जो करी नित्य पाठ । स्तुती ही तशी जो करी एकनिष्ठ ॥
तयाचे कुळीं दीप सज्ञान राशी । नमस्कार माझा गुरुदत्तात्रेयासी ॥ ५ ॥
औदुंबरा सन्निध सर्वकाळ । जनीं वनीं तो क्रमि सर्वकाळ ॥
जगद्गुरुचे गुण संपूर्ण राशी । नमस्कार माझा गुरुदत्तात्रेयासी ॥ ६ ॥
देवोनि रजका राज्यासनाला । स्फोटादि रोगा पळवोनि नेला ॥
तैशी कृपा करी तारी आम्हांसी । नमस्कार माझा गुरुदत्तात्रेयासी ॥ ७ ॥
असें सत्वधीरानुसुयादि माता । त्रिमुर्तीसि त्या मनीं नित्य ध्यातां ॥
हरे रोग दारिध्रही सर्व नाशी । नमस्कार माझा गुरुदत्तात्रेयासी ॥ ८ ॥
धरा हो तुम्ही निश्चयो अष्टकाचा । करा हो करा पाठ दत्तात्रेयाचा ॥
नमा हो नमा दत्तदासानुंदासीं । नमस्कार माझा गुरुदत्तात्रेयासी ॥ ९ ॥

## ॥ मनाचे श्लोक ॥

धर्माच्या करितां आम्हांस जगतीं रामानें धाडियलें ।
एसें जाणुनि रामभक्ति करितां ऐश्र्वर्य हें लाधले ।
आतां धर्म सख्या तुझ्या पुढतिं हा नम्रत्वेनें असें ।
इच्छा हो जसि मानसीं करितसें हो देह तुझा असे ॥१॥
सदा सर्वदा योग तुझा घडावा । तुझे कारणी देह माझा पडावा ।
उपेक्षुं नको गुणवंता अनंता । रघुनायका मागणें हेचि आतां ॥२॥
उपासनेला दृढ चालवावें भूदेव संतासीं सदा लवावें सत्कर्म योगें वय घालवावे ॥
सर्वांमुखी मंगल बोलावे ॥३॥
समर्थांचिया सेवकां वक्र पाहे । असा सर्व भूमंडळी कोण आहे ।
जयाचि लिला वर्णिती लोक तिन्ही । नुपेक्षीं कदा रामदासाभिमानीं ॥४॥
ज्या ज्या स्थळी हें मन जाय माझें । त्या त्या स्थळी हें निज रूप तुझें ।
मी ठेवितों मस्तक ज्या ठिकाणीं । तेथे तुझे सद्गुरु पाय दोन्ही ॥५॥

### *** जय जय रघुवीर समर्थ ***

*****

## ॥ पसाय दान ॥

आतां विश्वात्मकें देवे । येणें वाग्यज्ञे तोषावें ।
तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ॥१॥
जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।
भूतां परस्परें पडो । मैत्र जीवांचे ॥२॥
दुरितांचे तिमिर जावो । विश्वस्वधर्म सूर्ये पाहो ।
जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ॥३॥
वर्षत सकळमंगळीं । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळीं । भेटो तयां भूतां ॥४॥
चला कल्पतरुंचे आरव । चेतना चिंतामणीचे गांव ।
बोलते जे अर्णव । पीयुषाचे ॥५॥
चंद्रमें जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वाही सदा सज्जन । सोयरे होतु ॥६॥
किंबहुना सर्व सुखी । पूर्ण होऊनि तिन्हीं लोकीं ।
भजिजो अदिपुरखी अखंडीत ॥७॥
आणि ग्रंथोपजीविये । विषेशी लोकीं इयें ।
दृष्टादृष्ट विज यें । हो आवें जी ॥८॥
येथे म्हणे श्रीविश्वेश्वराओ । हा होईल दानपसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया झाला ॥९॥